स्थापना - १७/११/१९८०

# ग्रामपंचायत चिखलवाडी

ता. पाटण जि. सातारा

जावक क्र.

दिनांक : ०९ /०१ /२०२३

प्रति,

प्राचार्य सो

काकासाहेब चव्हाण महाविद्यालय तळमावले

ता.पाटण जि.सातारा.

विषय:- मौजे चिखलेवाडी ता.पाटण येथील आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराबाबत....

महोद्य,

उपरोक्त विषयानुसार विनंतीपूर्वक कळवितो की, व आमच्या मागणीनुसार आमच्या गावामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मंगळवार दि.03/01/2023 ते सोमवार 09/01/2023 या कालावधीत आयोजित केले होते. सदर शिबिराच्या माध्यमातून चिखलेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत सर्व वाड्यांमधील अंतर्गत रस्ते,गटारे,मंदिरे तसेच स्मशानभूमी ई. ठिकाणची स्वच्छता झाली. स्वच्छतेबरोबरच या शिबिराच्या माध्यमातून गावातील ग्रामस्थांचे प्रभोदनही करण्यात आले . या शिबिराच्या माध्यमातून अंदाजे 125000/-रु ची कामे करण्यात आली . शिबीर आयोजित केल्याबद्दल आपले मनपूर्वक आभार भविष्यातही आपले सहकार्य मिळावे ही विनंती.

सरपंच

ग्रामपंचायत चिखलवाडी

स्थापना : १९५७

# निर्मल ग्रामपंचायत भोसगांव

ता. पाटण, जि. सातारा.

ग्रा. पं. कराची रक्कम मुदतीत भरुन सहकार्य करा.
पाण्याचा अपव्यय टाळा. नळाला तोटी बसवा.
कुटुंब लहान, सुख महान.

स्थानिक जन्म-मृत्यूची नोंद २१ दिवसात करुन घ्या.
अल्पबचत आपल्यासाठी व राज्यासाठी
पाण्यात मेडीक्लोअर टाकुन पाणी वापरा

दिनांक 30 / 12 / 2018

## दाखला

दाखला देण्यात येतो की, काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले यांचेवतीने आमच्या गावात दि. 22/12/2018 (शनिवार) ते दि. 28/12/2018 (शुक्रवार) या दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले होते सदर शिबिरा मध्ये विद्यार्थ्यांनी मौजे भोसगाव ते आंब्रुळकरवाडी दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष जतन व संवर्धन, फुल पाखरू उद्यानाची स्वच्छता, मौजे भोसगाव मधील रस्ते, गटारीची स्वच्छता तसेच जी.प. केंद्रशाळा परिसर स्वच्छता, गवत कापणी, शाळा परिसरातील लहान मोठी टाकी स्वच्छता, निसर्ग पर्यटन केंद्र क्षेत्रातील दुर्मिळ वनस्पती, वृक्ष, शुक्ष्म जीव पशु, पक्षी यांच्या सुरक्षिततेसाठी जाळरेषा (अंदाजे 6 ते 7 कि.मी), भवानी मंदिर परिसर, स्मशानभूमि स्वच्छता, ग्रामपंचायत कार्यालया समोरील रस्ता ते चिंचेच्या झाडापर्यंत साइड पट्टी तयार करणे तसेच विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमातून ग्रामस्थांचे प्रबोधन केले. शिबिर काळात गांवा मधील स्वच्छता रेली काढून गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. या सर्व कामांचे अंदाजे मूल्य 132540/- रु (एक लाख बत्तीस हजार पाचशे चाळिस रुपये फक्त इतके होत आहे.

कळावे,

धन्यवाद !

ग्रामसेवक
ग्रामपंचायत भोसगांव
ता. पाटण, जि. सातारा

सरपंच
ग्रामपंचायत भोसगांव
ता. पाटण, जि. सातारा